**"एप्रिल २०१७" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

## (अ) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक १ एप्रिल २०१७ च्या शासन आदेशान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील चारही आहार / उपाहारगृहांच्या कार्यान्वियतेसाठी लागणारा कच्चा माल व वस्तू साहित्य इत्यादींचा पुरवठा करण्यासाठी दिनांक १ एप्रिल २०१७ ते ३० जून २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक १ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये आस्थापना मंडळ क्रमांक-२ च्या कार्यकक्षेतील पदावर पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी निश्चित चांगली (ब+) ऐवजी उत्कृष्ट (अ) निश्चित करण्यात आली आहे.
- दिनांक ३ एप्रिल २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन कक्ष अधिकारी, अवर सचिव, उपसचिव व सहसचिव संवर्गातील अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालासाठी प्रतिवेदन अधिकारी आणि पुर्नविलोकन अधिकारी निश्चित करण्यात आले आहेत.
- दिनांक ३ एप्रिल २०१७ च्या शासन पूरक पत्रान्वये शासन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या परिविक्षाधीन कालावधीतील मुल्यमापनाच्या विहित नमुन्यातील ई घटकानंतर "(फ) प्रशिक्षण कालावधीचे मुल्यांकन" या घटकाचा समावेश करण्यात आला आहे.
- दिनांक २१ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेला विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्चासाठी तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन यासाठी एप्रिल व मे २०१७ या दोन महिन्यांकरिता लेखानुदानाच्या मर्यादेत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेले वेतनेतर रु.३.३३ लाख व वेतने रु.१६.६७ लाख असे एकूण रु.२०.०० लाख इतके योजनेतर सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २१ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद या संस्थेला विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्चासाठी तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन यासाठी एप्रिल व मे २०१७ या दोन महिन्यांकरिता लेखानुदानाच्या मर्यादेत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेले वेतनेतर रु.३.३३ लाख व वेतने रु.१६.६७ लाख असे एकूण रु.२०.०० लाख इतके योजनेतर सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २१ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेला एप्रिल व मे २०१७ या दोन महिन्यांकरिता योजनेतर खर्चासाठी (प्रशिक्षण शुल्क) अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेले एकूण रु.६६.६७ लाख इतके सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २१ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीतून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे व ६ विभागीय व ३५ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना प्रशासकीय प्रशिक्षणाकरिता (प्रशिक्षण शुल्क) प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन लेखानुदानाच्या मर्यादेत प्रथम दोन महिन्याच्या प्रशिक्षण शुल्काच्या खर्चापोटी रु.४५०.०० लाख इतका निधी वितरित करण्यात आला आहे. उक्त शासन निर्णयातील परिच्छेद-१ व ४ मधील "यशदा, पुणे या नावासमोर रु.१२५.०० लाख ऐवजी रु.१२०.०० लाख असे वाचावे" असे दिनांक २५ एप्रिल २०१७ च्या रोजी शासन शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.
- दिनांक १९ एप्रिल २०१७ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये बिगर राज्य नागरी सेवेतून (Non-SCS) प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी गोपनीय अभिलेखासाठी पात्रता निकष विहित करण्यात आला आहे.
- दिनांक १८ एप्रिल २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखक यांची सेवाप्रवेशात्तर प्रशिक्षण परीक्षा २०१७ ही दिनांक ६ मे २०१७ रोजी सिडनॅहम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.
- केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय, निवृत्तीवेतन व निवृत्तीवेतनधारकांचे कल्याण विभाग, नवी दिल्ली यांच्या एफ.क्रमांक-४२/१५/२०१६-पीॲण्डपीडब्ल्यू(जी), दिनांक ७ एप्रिल २०१७ च्या कार्यालयीन ज्ञापनानुसार, विभागाच्या दिनांक १८ एप्रिल २०१७ च्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील

निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना दिनांक १ जानेवारी २०१७ पासून २% महागाई भत्ता मंजूर करण्यात आला आहे.

- केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालय (खर्च विभाग) यांच्या क्रमांक-१/३/२०१७-ई-II(बी), नवी दिल्ली, दिनांक ३० मार्च २०१७ च्या कार्यालयीन ज्ञापनानुसार, विभागाच्या दिनांक १७ एप्रिल २०१७ च्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २०१७ पासून २ महागाई भत्ता मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक १८ एप्रिल २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या कार्यालयातील लिपिक / लिपिक-टंकलेखक, टंकलेखक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीव्दारे नियुक्तीसाठी १३० पदांसाठी "सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१७" ही दिनांक २५ जून २०१७ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.
- दिनांक १८ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागातील गट-ब (अराजपत्रित) मधील सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील सरळसेवा कोटयातील १०० पदे वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २ जून २०१५ च्या कमाल मर्यादेतून वगळण्यात आली आहेत. सदर पदे "सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी परीक्षा २०१७" मधून भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### (ब) <u>पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची</u>

- दिनांक ३ एप्रिल २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये श्री.सा.ना.घिगे यांचा कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र सहायकांच्या दिनांक १ जानेवारी २०११, २०१२, २०१३ च्या सामाईक ज्येष्ठतासूचीत ज्येष्ठताक्रम निश्चित करण्यात आला आहे.
- दिनांक २६ एप्रिल २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये दिनांक १ जानेवारी रोजीच्या सन २००१ ते २००६ या कालावधीतील अनुक्रमे वर्षनिहाय ५८२, ५९१, ५६७, ५४८, ५४५, ५५२ (एकूण ३३८५) कक्ष अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २४ एप्रिल २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ३४ सहसचिवांची दिनांक १ जानेवारी २०१७ ची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २९ एप्रिल २०१७ च्या शासन आदेशान्वये ४७ लिपिक-टंकलेखकांना सहायक कक्ष अधिकारी पदावर दिलेल्या पदोन्नत्या नियमित करण्यात आल्या आहेत.

### (क) <u>प्रशिक्षण</u>

- दिनांक ५ एप्रिल २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये "सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण व परीक्षा २०१७ साठी" दिनांक ४ मे २०१७ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

### (ड) <u>बदल्या / पदस्थापना</u>

- भारतीय प्रशासन सेवेतील ७६ अधिकाऱ्यांच्या करण्यात आल्या आहेत. उपसचिव व अवर सचिव संवर्गातील प्रत्येकी २ अधिकाऱ्यांना प्रत्यावर्तनानंतर बदलीने पदस्थापना देण्यात आली आहे.. एका सहायक कक्ष अधिकाऱ्याची बदली करण्यात आली आहे.
- उपसचिव संवर्गातील ३ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीला मुदतवाढ देण्यात आली आहे.

***********